RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(१४)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XLV OF 2025.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1948.

**सन २०२५ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४५.**

**महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

सन १९४८ चा महा. अधिनियम ६७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या कलम ४३ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील कलम ४३ वगळण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्य शासनाने जागतिकीकरण व उदारमतवादी संकल्पना अंगिकारली आहे व या संकल्पनेचा एक भाग म्हणून जमीन मालकास कोणत्याही परवानगीशिवाय आपली जमीन पर्यटन वा तत्संबंधातील बाबींकरिता वापरण्यास अनुमती दिलेली आहे. ही बाब लक्षात घेता तसेच, भारतीय संविधानाने दिलेल्या मालमत्ता धारण करण्याच्या हक्काच्या रक्षणासाठी महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील तरतुदींनुसार भूमीधारी जमीनधारकांस भूमीस्वामी धारकाचा दर्जा देऊन त्यांना त्यांच्या जमिनीचा अन्य विकासात्मक कामाकरिता उपयोग करणे शक्य व्हावे म्हणून महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियमातील कलम ४३ अन्वये टाकण्यात आलेले अशा जमिनींच्या हस्तांतरणावरील निर्बंध उठविणे गरजेचे झाले आहे. त्या दृष्टीने उक्त अधिनियमातील कलम ४३ वगळण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. वरील हेतू साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे २०२५

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य,

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.